**दिनांक १७.०२.२०२२ रोजीचे सर्वसाधारण सभेत पारित करण्यात आलेला तसेच त्याच सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक १०** :- प्रभाग क्रमांक १९ साईनगर येथील नविन सातुर्णा झोपडपट्टी मधील शिकस्त सार्वजनिक संडास पाडण्याबाबत.

**ठराव क्रमांक १०** :- मा. सभागृह नेता श्री. तुषार भारतीय यांनी दिनांक ०७/०१/२०२२ रोजी विषयांकित प्र.क्र.१९ साईनगर अकोली अंतर्गत येणाऱ्या नविन सातुर्णा येथे १५ वर्षापुर्वी सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम करण्यात आले होते. ते संपूर्ण शिकस्त झाले असल्यामुळे या परिसरातील नागरिक त्यांचा उपयोग घेत नाही. तसेच त्याची साफसफाई होत नसल्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत आहे व नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. झोपडपट्टी मधील शिकस्त सार्वजनिक शौचालय पाडण्याबाबत सन्मा. श्री. तुषार भारतीय ह्यांनी प्रशासनाला पत्र दिलेले आहे. त्यानुसार प्रशासनाकडुन पाहणी करण्यात आली सदर विद्यमान इमारत शिकस्त असल्यामुळे पाडणे अत्यावश्यक आहे. मा. आयुक्त यांनी दिनांक ८.२.२२ रोजीची मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर विषय सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस सादर करण्यात आला आहे. सदर्हु प्रशासकीय विषयास ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत असून ठराव याच सभेत कायम करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम व पारीत

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका, अमरावती.**

**स्वा/-**
**सभापती तथा महापौर,**
**महानगरपालिका, अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती